अहमदाबाद सहल

यंदा आमच्याकडे दिवाळी नव्हती. एप्रिल महिन्यात आई देवाघरी गेली. दिवाळीत घरीपण राहणे शक्य नव्हते. कारणे दोन. एक म्हणजे वर्षभर रोज आम्हां उभयतांना नोकरीमुळे कुठेही जाता येत नाही आणि म्हणुन २-४ दिवसांचा हवाबदल हवा हवासा वाटतो. दुसरं म्हणजे दिवाळीत आईची फारच आठवण झाली असती. तिचा प्रत्येक सण साजरा करतानांचा उत्साह, आनंद कित्येक वर्षांपासुन अनुभवला होता. सण कोणताही असो, पाडवा असो कि चैत्रगौर, वटपोर्णिमा असो की नारळी पोर्णिमा, गणपती गौरी असो की देवीचे नवरात्र असो, तिची सर्व लगबग, तयारी, हौशेने सर्व घर आनंदमयी असायचे. दिवाळी तर सणांचा राजाच. त्यामुळे धनत्रयोदशीला सायंकाळची पुजा, चतुर्दशीला पहाटे 3-3½ ला उठून पाण्याचा बंब पेटवणे, आम्हां सगळ्यांना उटणे व अभ्यंग तेल लावणे, लक्ष्मीपूजनासाठीची सर्व पूजेची तयारी व मग बाबांची लक्ष्मीपूजा, पाडव्याला चकली, लाडू, करंजी, अनारसे, शंकरपाळी, चिवडा, शेव इ. चा फराळ (कडबोळी मात्र तिने कधी केली नाही), भाऊबीजेला मामासाठी दहीवडा... सगळं सगळं आठवतयं. आमच्या पिंपळगांवच्या दोन खोल्यांच्या छोट्या घरात सर्व सण मोठ्या थाटामाटात साजरे होत.

तिच्याजवळ पैशाची श्रीमंत नव्हती, पण मनाची श्रीमंती होती, कमालीचे समाधान, उत्साह तिच्याजवळ होते. माझ्यामते जुन्या पिढीतल्या लोकांकडे अशी मनाची श्रीमंती होती. आमची पिढी कदाचित मनाचीही श्रीमंती नाही ना पैशाची.

असो. तर आम्ही दिवाळीत कुठेतरी जायचे ठरवले. पहिल्यांदा अरुणाचलमधील "आवळी" जायचं ठरवतं होत पण सुटी ३-४ दिवसांचीच होती, मग शेगांव, गोवा, कोस्टल कर्नाटक कि गुजराथ असे पर्याय आमचेसमोर होते. शेवटी गुजराथ मध्ये जायचे ठरवले. द्वारका, सोमनाथ, जुनागड - गीर - राजकोट - अहमदाबाद इ. ठरवले. पण हातात फक्त ३-४ दिवस त्यामुळे शेवटी अहमदाबाद येवढेच ठरले. ह्यापूर्वी आम्ही अशा सहली माझ्या मामे मामे व मावस भाऊ व त्याच्या कुटुंबियांबरोबर केलेल्या. ह्यावेळी सुटीअभावी शक्य नव्हते. सहज म्हणून सौभाग्यवतींच्या भावाला व त्याच्या बायकोला फोन २४/१० ला केला, ते दोघेही सुटी असल्यामुळे तयार झाले. इंडिगो ट्रॅव्हल्सचे व Makemytrip वरून हॉटेलचे online booking झाले. पुढचा सर्व कार्यक्रम अहमदाबादला गेल्यावर ठरवू असे नक्की केले. बाकी Google मुळे सर्वच माहिती पुष्करने काढून ठेवली.

२८/१० ला रात्री ८.३० ची गाडी होती. सवयीप्रमाणे पुष्करला दोन रिक्षा बोलवण्यास सांगितले. त्याने माझ्याकडे "कुठल्या जमान्यात वावरता" अशा आविर्भावात बघुन शांतपणे OLA & UBER Book केली. गाडी अगदी वेळेवर आली. थोड्यावेळाने प्राचीने घरीच तयार केलेल्या व तिने व गौरीने अगदी Professionally Pack केलेल्या जेवणाचा आनंद घेत झोपी गेलो. मी आणि गौरी सोडून सगळे बहुधा जागेच होते. मला पहाटे जाग आली त्यावेळी गाडी बडोद्याजवळ पोहचली होती. पहाटेच्या गार वाऱ्याने (की AC जास्त वाटल्यामुळे) छान वाटले व कुडकुडत पुन्हा झोप. सकाळी सातला अहमदाबादला पोहचलो. पुन्हा UBER ने हॉटेल "TRIBOO RAJDEEP INN" वर चेक इन केले. आंघोळ, नाश्ता करुन कुठे जायचे त्याची चर्चा. ENOVA दिवसभरासाठी ठरवली. साधारणत: ११ च्या सुमारास "साबरमती" आश्रमात पोहचलो. आश्रम छान आहे. त्यातील Art Galary मधे गांधीजींच्या जीवनातील सर्व प्रमुख घटनांवर आधारित पेन्टिंग्स आहेत. खूपच छान आहेत. विविध पुतळे आहेत. मग त्यांचे निवास स्थान, विनोबांचे निवास स्थान इ. बघितले. साबरमती नदीच्या किनाऱ्यावरच हा आश्रम आहे. ह्या नदीवर अहमदाबादमध्ये ६-८ पूल आहेत. नदीच्या दोन्ही तटांवर सुंदर काठ

निर्माण केलेले असुन त्याला "साबरमती RIVER FRONT" असे म्हणले जाते. दुतर्फा काठांवर दिवे बसवले असुन संध्याकाळी ते फारच सुरेख दिसतात.

गाडीवाल्यास दुपारी दोनला खास गुजराथी जेवण जिथे मिळेल अशा हॉटेलमध्ये नेण्यास सांगितले. तो बहुधा अहमदाबादमध्ये नवीन असल्याने त्याला काही ते जमेना. Thanks to Google. पुष्करने पालडीजवळ हॉटेल 'पकवान' शोधले. अर्थात आम्ही नाशिकवाल्यांना गुजराथी थाळी काही नवीन नाही. पकवानमधील थाळी नाशिकमध्ये अनेक ठिकाणी मिळते. अर्थात भूक लागलेली - जेवण छान झाले.

जेवणानंतर "तीन दरवाजा" जवळच्या एका मशिदीतील सुरेख नक्षीकाम बघण्याचे संदीपने सुचवले. नक्षीकाम खूपच छान व विशेष म्हणजे पूर्ण दगडामध्ये अतिशय कलात्मक रितीने हे काम केलेले आहे. नक्षिकामामुळे तिथे जाळीसारखा आकार आहे. मशिदीमध्ये स्त्रीयांना जाण्यास मज्जाव आहे.

तिथुन मग "दादा हरी की वाव" इथे जायचे ठरले. आमच्या चालकाला काहीच माहिती नसल्याने आम्हीच विचारपूस करत एकदाचे त्या ठिकाणी पोहचलो. "वाव" म्हणजे पायऱ्या असलेली विहिर. "ह्यात काय बघायचे" असा सर्वसाधारण प्रश्न जो सगळ्यांना पडू शकेल तोच मलाही होता.

विहीर ५-७ मजल्यांची आहे. अर्थात ह्या पर्यटन स्थळांकडे सरकारचे विशेष लक्ष नाही. इथे प्रचंड माकडं असल्याने १-२ मजले पायऱ्या उतरल्यानंतर पुढे जाताच येत नाही.

थोडावेळ बघुन आम्ही जवळच असणाऱ्या सरदार पटेल म्युझियमला पोहचलो. हे बरेच मोठे आहे. सर्वप्रथम सरदारांच्या जीवनावर आधारीत ३५-४० मिनिटांची Documentry Film बघायला मिळते. स्वातंत्र्यानंतर ५०० हून अधिक संस्थाने सरदारांनी खालसा करून त्यांचे विलिनीकरणाचे महत्वाचे काम बजावले आहे. अर्थातच नेहरूंच्या आग्रहामुळे काश्मीर वगळून. म्युझियममध्ये सरदारांचा जीवनपट साबरमतीप्रमाणेच पेंटिंगद्वारे आपल्यासमोर येतो. म्युझियम भव्य दिव्य पण स्वच्छ आहे. पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ टॉयलेट्स आहेत. संध्याकाळी ६.३० च्या सुमारास आवारातच असणाऱ्या रेस्टॉरन्ट मध्ये चहाचा आस्वाद घेतला. रात्रीचे जागरण, दिवसभर हिंडल्यामुळे मरगळ एकप्रकारचा थकवा. ह्या चहाने घालविला. चहाघेऊन साबरमती RIVER Front चा नजारा गाडीतुनच बघत हॉटेलवर पोहचलो. शेजारच्याच South Indian हॉटेलात थोडेसे खाऊन झोपी गेलो.

सकाळी गजरामुळे जाग आली. सर्व आवरून, Break fast आणि मग दिवसाच्या प्लॅन ठरवण्यासाठी चर्चा. पुन्हा दिवसभरासाठी ENOVA ठरवली. त्यावेळीच्या ड्रायव्हर मात्र बोलका व माहितगार होता. त्याने हॉटेलवरून प्रथम S.G. Highway वर गाडी घेऊन

प्रथम बालाजी मंदीरात आगले. दर्शन घेऊन जवळच असणाऱ्या वैष्णवदेवी मंदीरात पोह्चलो. तिथुन "त्रिमंदीर" इथे आलो. हे जैनांचे मंदीर आहे. मध्यभागी महावीर भगवानाचे तीन अवतार डाव्या बाजुकडे शंकर, गणपती, पार्वती तर उजव्या बाजुला राम, सीता, लक्ष्मण. मंदीराचे आवार मोठे आहे. संगमरवरी पायऱ्यांवर पांढरा रंग दिल्याने तळपायांना भाजत नाही. मंदीराच्या आवारातच असणाऱ्या Food court मध्ये ICE Cream खाऊन "अदलाज वाव" इथे पोहचलो. काल्च्या "दादा हरी वाव" च्या अनुभवामुळे फार काही बघायला मिळेल अशी आशा नव्हती. पण ही वाव बघण्यासारखी आहे. सात मजल्यांची आहे. प्रत्येक मजल्याला साधारणत: वीस पायऱ्या. सात इमले पायऱ्यांनी उतरल्यावर जलकुंड लागला. ह्यात पूर्वी राण्या आंघोळ करत. प्रत्येक मजल्यावर दगडावर केलेले कोरीव काम बघण्यासारखे. इथे माकडं वगैरे नाहीत. भरपूर लोकं वाव बघायला आलेली.

एव्हाना दुपारचा दीड वाजलेला म्हणून जेवणासाठी हॉटेल "धैर्य छाबिल" इथे पोह्चलो. खास काठीयावाड पध्दतीचे जेवण घेतले. जेवणात वांग्यांचे भरीत, टोमॅटो शेव (म्हणजे आपल्याकडील शेवभाजी), साधी व मसालेदार खिचडी व ताक. असा बेत. जेवण छान होते. जेवणानंतर जरा सुस्तीच आलेली, त्यात ऑक्टोबर हीट. अहमदाबाद तसे उष्णच, त्यामुळे नोव्हेंबर, डिसेंबर

महिनाच इथे फिरायला बरे आहेत.

आता आमची गाडी "इंद्रोडा पार्क" कडे धावायला लागली. ड्रायव्हर मधून मधून माहिती सांगत असे. इंद्रोडा पार्कही मोठे आहे. प्रथम तेथे असणाऱ्या "डायनोसोर पार्क" मध्ये फेरफटका मारत गुजरातमध्ये सापडलेल्या अनेक डायनोसोरच्या प्रतिकृती इथे आहेत. तिथुन मग आम्ही बॉटनिकल गार्डन बघुन सर्पगृहाकडे पोचलो, इथे नाग, अजगर, विविध सापांचे पिंजरे आहेत. मग पक्षी उद्यान. ह्यात गरूड, घार, पोपट इ. बघुन हरीण, काळवीट, सांबर, रानटी कुत्री, कोल्हे इ. प्राणी बघत बघत मजा येत होती. थोडपुढे गेल्यावर अतिशय रुबाबदार दिसणारा बिबट्या दिसला.

साधारण ४ च्या सुमारास इंद्रोडा सोडून आम्ही अक्षरधाम मंदीराकडे रवाना झालो. मंदीर खूपच छान आहे व आवारही प्रचंड आहे. मंदीरात मोबाईल्स, कॅमेरे इ नेण्यास परवानगी नाही. अर्थात आपल्याला ह्या वस्तू जमा करून परत जातांना घेता येतात. मंदिराच्या आवारात शिरल्यानंतर सरळ सरळ बरेच चालावे लागते, साधारणतः १/२ ते ३/४ कि.मी. मंदिर सुरेख आहे. आत जाण्याआधी आपली पादत्राणे एका पिशवीत ठेवुन (पिशवी दिली जाते), टोकन घेऊन जायचे. मंदीराला आतुन, बाहेरून सुंदर नक्षीकाम आहे. गुजरातमध्ये सगळ्या मंदीरात पादत्राणे ठेवण्यासाठी पिशवी दिली जाते

आणि हि सेवा विनाशुल्क आहे. तुळनेने भिकारीसुध्दा कमी आढळले. सर्व मंदीरांमध्ये पिण्याच्या (स्वच्छ) पाण्याची सोय आहे.
संध्याकाळ व्हायला आली होती. आणि ती लक्ष्मीपूजना ची ती संध्याकाळ होती. पूर्ण मंदीरावर दिव्यांची रोषणाई होती. दिव्यांच्या रोषणाई मध्ये मंदीर व मंदीर परिसर खास्च सुरेख दिसत होता. संध्याकाळी ७.३० वाजता वॉटरशो होता. तो बघण्याचे ठरवले. पण भूक लागली होती. थोडं शोधल्यावर मंदीराच्या आवारात उत्तम Food court आहे. तिथे गुजराथी, पंजाबी थाळी, South Indian Food, पंजाबी डिशेस, नाष्टासाठी चाट, बटाटेवडा, न्युडल्स, पिझा, बर्गर, पास्ता, चहा, कॉफी, शीतपेये सर्व काही होते. एकंदर ५-६ मोठी counters व वेगवेगळ्या जागी बसायची सोय. सगळीकडे स्वच्छता आणि ४००-५०० माणसे एकावेळी बसुन जेवण- नाष्टा करू शकतात. आम्ही प्रथम दोन वडा प्लेटस् घेतल्या. एका प्लेटमध्ये ३. वडा खूपच चविष्ट होता. मग चाट घेतलं व मग मस्त फक्कड चहा. एकंदर काय स्वच्छ परिसर, चविष्ट खाद्यपदार्थ व तेही कमी भावात! वॉटर शोची तिकिटे घेऊन आम्ही Open Air थिएटर मध्ये आलो. साधारणतः ५-७ हजार लोकांना तेथे बसण्याची व्यवस्था आहे. अनेक लोक थिएटरमध्ये येतानाच प्रवेशाजवळच्या Fast food counter वरून पॉपकॉर्नस्

आयस्क्रिम इ. घेऊन त्याचा स्वाद घेत होतो. ७.३० वा. पाण्याचे कारंजी व लेझरचा वापर करून बनिवलेला शो सुरू झाला. पुराणातल्या नाचिकेत व यमावर आधारीत ४०-४५ मिनिटांचा तो शो होता. मला ही कथाही माहिती नव्हती व नचिकेतही माहिती नव्हता. पण बघायला मजा आली. विशेष म्हणजे नाचिकेत व त्याच्या वडीलांची भूमिका दोन स्थानिक अभिनेतेही करत होते. शोच्या ऑडीओ मध्ये जेव्हा जेव्हा नाचिकेत व त्याच्या वडीलांचे संवाद होते, त्यावेळी प्रकाशझोत त्यांच्यावर पडत होता. लक्ष्मीपूजनाची अमावास्या असल्याने त्या काळोखात लेझर शो फारच सुरेख वाटत होता. अधुनमधुन दिवाळीच्या फटाक्यांचाही आवाज सुरू होता. ८.३० वाजता मंदिरातुन बाहेर पडत गाडी गाठली व ९.१५ पर्यंत Treebo0 मध्ये परतलो. विशेष भूक नव्हती, त्यामुळे काल्च्याच मद्रास हॉटेलमध्ये खाण झालं. आदल्या दिवशी मी उपाशी होतो तर त्या दिवशी खा मसाला वरून छान ताक. दिवसभराच्या उन्हांमुळे सर्वांची दमछाक झालेली. अदलज वाव, इंद्रोडा आणि अक्षरधामची रम्य दृष्ये डोळ्यांसमोर येत येत निद्रादेवी प्रसन्न झाली ती थेट पुढच्या दिवशीच्या गजरापर्यंत.

सोमवार – दिवाळी पाडवा. हॉटेल वर चहा-नाष्टा करून आज काय करायचे हे ठरवणे सुरु होते. आज जरा प्रश्नच होता कारण अहमदाबादमध्ये सोमवारी सर्व पर्यटन स्थळांना साप्ताहिक सुट्टी असते, हे आदल्या दिवशीच समजले होते. पुष्करने science city चा नंबर मिळवला व फोन करून विचारले. सुदैवाने दिवाळी म्हणुन ते सुरु होते. कंकरीया तलाव बघायचा होता पण तो बंद होता.

मग ESCON मंदीराला जायचं, तिथुन science city व नंतर तीन दरवाजा असे ठरवले. ESCON मंदीर आमचे हॉटेलपासुन जवळ होते. AMTS (अहमदाबाद म्युनसिपल ट्रान्सपोर्ट सर्व्हिस) च्या city bus ने जायचे ठरले. AMTS चा बस स्टॉपही आमच्या हॉटेलच्या दारात होता. Google वरून बस टाईम काढला. १०.५० मिनिटांची बस होती. १०.२० झालेले. ताबडतोब आवरून १०.४५ पर्यंत बस स्टॉपवर आलो. बस खरोखरच पाचच मिनिटात आली, अर्थातच रिकामी. १०-१२ मिनिटात मंदीराला पोहचलो. मंदीराच्या आवारात शिरल्याबरोबर लगेच पादत्राणे काढण्यासाठीचे counter वर लागुनच food court ही दिसला, त्याच्या शेजारी स्वच्छ पिण्याचे पाणी, हात-पाय धुण्यासाठी नळ व टॉयलेट.

ESCON मंदीर सुंदर आहे. कृष्णाने आजच्या (पाडव्याच्या) दिवशी गोवर्धन पर्वत आपल्या करंगळीवर घेतला होता. त्यामुळे तिथे त्याची पूजा सुरू होती.

मंदीरातुन मग आम्ही free ride असल्याने UBER ने science सिटीमध्ये पोहचलो. Imax मध्ये 1 वाजता 3D show होता तो book केला. तिथिल ऑडीटोरीअमला भेट दिली. लहान मुलांसाठी विज्ञानाविषयी छान माहिती आहे. साधारण पाऊण तास तिथली माहिती बघुन बाहेर येऊन Imax मधील 40 मिनिटांचा चंद्रावरच्या मोहिमेविषयी 3D Movie बघितला. जेवणाची वेळ त्यामुळे समोरच्या FOOD court कडे निघालो, पण त्यावेळी सौ. शिल्पाचा मोबाईल हरवल्याचे लक्षात आले. मग Auditorium, Imax अन्य ठिकाणी शोधमोहिम व चौकशी. न मिळाल्यामुळे तक्रार इ. करून दुपारी ३:30 ला जेवण करून Solar energy Park, बोटॅनिकल गार्डन बघुन "प्लॅनेट Earth" ला आलो. छान आहे. भुकंप, समुद्राचे अंतरंग, मानवी शरिराविषयी माहिती आणि विविध प्रकारचे गेम्स आहेत. तास दीड तास सर्व बघुन बाहेर पडलो. माझी कॉलेजमधील विद्यार्थिनी "सपना" भेटली. त्यानंतर तेथेच चहा घेऊन संध्याकाळी ६:१५ च्या सुमारास बाहेर पडलो. शेअर रिक्षाने प्रथम S.G. Highway वर आलो

न तिथुन पुन्हा शेअर रिक्षाने ESCON मंदीराच्या चौकात पोहचलो. आता इथुन आम्हाला तीन दरवाजा परिसरात जायचे होते. Bus चा प्रयत्न केला पण मग रिक्षानेच तेथे पोहचलो. हॉटेल मालकाने सकाळीच आता मार्केट दिवाळीमुळे २-४ दिवस बंद राहिल असे सांगितले होते, पण धलगरवड हे मुस्लीम मार्केट चालू असेल हे सांगितले होते. "धलगरवड" हे तीन दरवाजा जवळचे कपड्यांसाठी प्रसिध्द मार्केट आहे. पण आम्हाला तिथे पोहचण्यास ८ वाजुन गेले होते व त्यामुळे मार्केट बंद झाले होते. पण काही दुकाने उघडी असल्यामुळे बघत बघत "तीन दरवाजा" पर्यंत पोहचलो. एकंदर काय तर शॉपिंग होणार नाही हे लक्षात आले. मग आता "खाना" मार्केट ची चौकशी केली. तेव्हा समजले की "खाना" चालू आहे. तीन दरवाजाच्या एका बाजुस NON-VEG व विरुध्द बाजुला VGE खाना. आम्ही अर्थातच VEG वाल्या बाजुला चालायला सुरवात केली. थोडे पुढे गेल्यावर "कंडोई" स्वीटसचे दुकान दिसले. अहमदाबादमधील हे प्रसिध्द मिठाई दुकान आहे. अर्थात आम्हाला मिठाई नाही तर खायच होत. चौकशी करत १-२ गल्लीबोळानुन पुढे आल्यावर खाण्याचे अनेक स्टॉल्स् दिसायला लागले. त्यात पावभाजी, (खरतर ह्याला काही ठिकाणी भाजी-पाव असेही म्हणतात), ग्रील्ड सॅन्डवीच, आदी दिसत होते.

थोड पुढे गेल्यावर मग आम्हाला जे खायचं होत ते दिसायला लागले. अहमदाबादमधील ह्या गल्लीने इंदोर सराफ बाजारातील खाऊगल्लीची आठवण होत होती. पण इंदोर खाऊगल्ली जास्त स्वच्छ आहे. पहिल्या स्टॉलवर "मेथी गोटा" आणि "डाळवडा" चा आस्वाद घेतला. दोन्हीही चविष्ट, त्यामुळे Repeat order. पुढल्या स्टॉलवर "फाफडा, भुजीयाँ आणि जिलेबी". तेही चविष्ट. पण आता आमतं जेवणच कमी झालेलं. पुढे जाऊन दहीवडा, पाणीपुरी घेतली. दहीवडा घेतल्याच (इंदोरमध्ये फास्च छान असतो. तिथे गुलाबजाम पण मिळतात, इथे आम्हाला दिसलेच नाही), पाणीपुरी तर अजिबातच आवडली नाही. आता सर्व झाल्यामुळे खडी मस्का कुल्फी घेतली. ती छान होती. एकंदर काय तर मस्त मजा आली. सर्व गल्ल्या माणसांनी तुडुंब भरलेल्या. रात्रीचे दहा वाजुन गेलेले त्यामुळे आम्ही हॉटेलकडे परत निघालो. रस्त्यात सायकलवरच बर्फामध्ये ठेवलेले "मीठा मसाला" पान. खाऊन तब्येत एकदम खुश, शिवाय किंमत १० रु. रिक्षा करुन सरळ हॉटेलवर आलो.

मंगळवार सकाळी उठलो. आज शेवटचा दिवस. संध्याकाळी ६.३० ची परतीची गाडी होती त्यामुळे ५ पर्यंतच हॉटेलवर परत यायचे ठरवलेले. आज फक्त २ च गोष्टी, कंकरीया Lake व काल राहिलेले शॉपिंग.

UBER ने कंकरीया Lake ला पोहचलो. खूपच सुंदर असा हा तलाव आहे व 3/4 कि.मी. गोलाकार पसरलेला आहे. संध्याकाळी सर्व तलावाला दिव्यांची रोषणाई असते. गुजराथ सरकारने फार कल्पकतेने हे पर्यटनस्थळ विकसित केलेले आहे. इथे Butterfly park, Glyder वर Ride, बलुनची राईड, माथेरानसारखी ट्रेनमधुन राईड, आर्चरी, मिरर मॅजीक, Seawage ride, लहानमुलांसाठी अनेक खेळ, तसेच Horror House व Kid's city, प्राणीसंग्रहालय इ उपलब्ध आहे. ज्यांना बोटींची आवड आहे, त्यांच्यासाठी Speed Boating ची व्यवस्था आहे. हे कमी म्हणुन की काय २०-२५ थोड्या थोड्या अंतरावर Food courts. एकंदर काय तर एक पूर्णदिवस धमाल करण्याचा हा spot आहे. आमच्याकडे अर्थातच एवढा वेळ नव्हता. प्राची, पुष्कर, गौरी व शिल्पाने Glyder Ride घेतली. Mirror Magic मध्ये सगळेच गेले होतो. ज्यांनी राजेश खन्नाचा रोटी हा सिनेमा पाहिला असेल त्यांना Mirror Magic लगेच समजेल. आम्हाला अर्थातच बाहेरचा वाट मिळाली नाही. ट्रेनमधुन सर्व तलावाला Round झाला, तो पर्यंत ९.३० वाजलाच होता. भूक लागलेली आणि समोर Food court होतेच. मस्तपैकी जेवण घेऊन कंकरीया Lake ला निरोप घेतला. रिक्षात बसुन सरळ "धलगर-वड" मार्केट मध्ये आलो.

अर्थात मला, संदीप व पुष्करला इथे काहीच काम नव्हते. फक्त ह्या तिघींबरोबर जायचे व खरेदी होण्याऱ्या वस्तू घ्यायच्या. मधेमधे "हो... होना", "नाही", "हो फारच छान" "हां जरा वेगळा आहे नाही?" असं समोरचा काय म्हणतो त्याप्रमाणे बोलायचे. अशाप्रकारे पुढील २-३ तास स्वतःसाठी आणि इतरांसाठी ड्रेस मटेरीअल्स्, कानातले, गळ्यातले, बेडशीट्स् अशी खरेदी झाली. मला ह्यातल विशेष काही समजत नाही पण एवढंच लक्षात आलं की व्हरायटी प्रचंड आणि स्वस्त. सर्व खरेदीकरून आम्ही हॉटेलवर परतलो, बॅगा लावल्या, फ्रेश होऊन हॉटेल विशाला इथे पोहचलो आणि गाडीत बसलो. बडोद्यापर्यंत गप्पा झाल्या. धाब्यावर जेवण करून झोपलो आणि सकाळी ८ ला घरी पोहचलो. धाब्यावरच्या जेवणांत काहीतरी गडबड असावी. कारण इथे दिवसभर आम्हा सगळ्यांना अपचन व उलट्यांचा त्रास झाला.

असो. तर चार दिवसांची ही मीनीसहल सुंदर झाली. वस्त्रपुरत्येक, कॅलिको म्युझियम व पक्षीसंग्रहालय काही बघणे झाले नाही. गुजराथमधील रस्ते खूपच छान, पर्यटन स्थळे स्वच्छ व खाण्यापाण्याची रेलचेल, OLA & UBER ची उत्तम सोय. सगळीकडे "नामो" Effect जाणवला, अर्थात ट्रॅफीक शिस्त सोडून.